# जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय, चंद्रपूर

पहिला माळा, खोली कमांक ५०, जिल्हा व सत्र न्यायालय इमारत, चंद्रपूर
दुरध्वनी कमांक 07172-254622, फॅक्स कमांक 07172-277486
ई-मेलः-dgp.chand@gmail.com


**जा. क्र. जिसव/लोअ/१८९२/२०१२ दिनांक २२/०६/२०१२**

## नागरिकांची सनद

| | | |
|---|---|---|
| १ | शासकीय कार्यालयाचे नावं :- | जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता कार्यालय, चंद्रपूर<br>सहाय्यक सरकारी वकील तथा अतिरिक्त लोक अभियोक्ता कार्यालय, वरोरा, जिल्हा चंद्रपूर. |
| २ | शासकीय व्यवस्थेतील खात्याचे स्थान :- | १. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ३२<br>२. अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, बॅरक कमांक ६, प्रेस जनरल, नरीमन पॉईंट, मनोरा, आमदार निवास समोर, मुंबई - ४०००२१. |
| ३ | कार्यालयातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवा :- | राज्याचे कायदेविषयक कामकाज चंद्रपूर जिल्हयाकरिता करणे व सर्व तऱ्हेचे दिवाणी व तत्संबंधीत दावे शासनाचे वतीने चालविणे.<br>तसेच शासनाकरिता फौजदारी खटल्यांचे कामकाज अभियोग पक्षाचे वतीने चालविणे. |
| ४ | कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार/ :- | महाराष्ट्र विधी अधिकारी, (नेमणुक, सेवेच्या शर्ती व मोबदला) नियम, १९८४, Maharashtra Law Officer (Appointment , Conditions of Service & Remuneration) Rules, 1984, शासनाचे कायदेविषयक कामकाज संचालन नियम, १९८४, The Rules for the Conduct of the Legal Affairs of Government, 1984, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, Civil Procedure Code, 1908, फौजदारी दंड संहिता, १९७३ (Criminal Procedure Code, 1973) |

| | | |
|---|---|---|
| ५ | कार्यालयाच्या सेवा कोणाला दिल्या जातात :- | न्यायालयातील दिवाणी व तत्सम खटल्यांचे कामकाज शासनाच्या वतीने चालविणे.<br>न्यायालयातील फौजदारी खटल्यांचे कामकाज सत्र न्यायालयात अभियोग पक्षाच्या वतीने चालविणे. |
| ६ | या सेवा कोण देते व कशा प्रकारे :- | महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ३२ यांनी नेमणुक केलेले जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर तसेच त्यांचे अधीनस्त सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त लोक अभियोक्ते हे दिवाणी न्यायालयातील दावे व तत्सम प्रकरणे सरकारचे वतीने तसेच सत्र न्यायालयातील खटले व तत्संबंधीत प्रकरणे अभियोग पक्षाचे वतीने चालवून सेवा प्रदान करतात. तसेच अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई अंतर्गत गृहविभागाने नेमणूक केलेले किंवा पदोन्न्त केलेले अतिरिक्त शासकीय अभियोक्ते हे सुध्दा जिल्हा शासकीय अभियोक्ता यांचे नियंत्रणात सत्र प्रकरणे अभियोग पक्षाचे वतीने चालवून सेवा देतात. |
| ७ | या सेवा दिल्या गेल्या नाही तर दाद कोणाकडे मागावयाची :- | १. मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ३२.<br><br>२. अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -२१<br><br>३. जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर. |
| ८ | तक्रार करण्यासाठी कोणती बंधने असतील :- | तक्रार करण्यासाठी कोणतीही बंधने नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| ९ | सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन :- | सरकारी वकीलांच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन करण्यासाठी -<br>१. मा. विधी परामर्शी व मुख्य सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-३२ किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी.<br><br>२. मा. सहसचिव, विधी व न्याय विभाग, सिव्हील लाईन्स, नागपूर, किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी<br><br>३. जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर व जिल्हा पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांची जिल्हा समिती. |
| १० | नागरिकांच्या जिल्हा सरकारी वकील व अभियोग शासकीय अभियोक्ता कार्यालयाकडून काय अपेक्षा आहे :- | सत्र न्यायालयातील फौजदारी प्रकरणे सक्षमतेने पक्षाकरिता चालविणे तसेच राज्य शासन व त्यांचे अधिकाऱ्यांचे त्यांचे विरोधातील दिवाणी व इतर प्रकरणे सक्षमपणे चालविणे.<br>न्यायदान प्रक्रियेत सहकार्य करून योग्य तो न्यायनिर्णय होण्यास मदत करणे |
| ११ | या कार्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी व त्यांची श्रेणी :- | जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर - वर्ग - १<br><br>सर्व सहाय्यक सरकारी वकील तथा अतिरिक्त लोक अभियोक्ता, चंद्रपूर तसेच वरोरा - वर्ग - १<br><br>चंद्रपूर येथे वरिष्ठ लिपिक, लघुलिपीक, कनिष्ठ लिपिक - वर्ग - ३ तसेच शिपाई - वर्ग - ४ कार्यरत आहेत.<br><br>वरोरा येथे अधिक्षक, लघुलेखक, कनिष्ठ लिपिक - वर्ग - ३, शिपाई - वर्ग -४ कार्यरत आहेत. |

| | |
|---|---|
| १२ तक्रार निवारणासाठी संपर्क अधिकारी :- | सरकारी वकील व अभियोक्त्यांच्या कामकाजाबाबत अथवा कार्यपध्दतीबाबत तक्रार असल्यास खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा :-<br>जिल्हा पातळीवर :-<br>जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर<br><br>तालुका पातळीवर :-<br>सहाय्यक सरकारी वकील तथा अतिरिक्त लोक अभियोक्ता, वरोरा. |

नागरिकाची सनद उपलब्ध करण्यात आली असून, नागरिकांचे या बाबत काही मत अथवा टिपणी असल्यास उपरोक्त नमुद पत्यावर कळविण्यात यावे. नागरिकांच्या सुचना स्वागतार्ह आहेत.

"सनदेत दिलेले वचन पुर्ण करण्यासाठी वचन देणारे जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर आणि ज्यांना वचन दिलेले आहे त्यांच्याशी बांधील आहे."

स्वा/-
जिल्हा सरकारी वकील तथा
लोक अभियोक्ता, चंद्रपूर

प्रस्तुत नागरिकांची सनद जिल्हा सरकारी वकील तथा लोक अभियोक्ता, चंद्रपूर यांनी स्वत: त्यांचे कार्यालयात व वरोरा येथील कार्यालयात संबंधीत सहाय्यक सरकारी वकील यांचे मार्फत दर्शनी भागास प्रसिध्द केली.

(एस.आर.आंबटकर)
जिल्हा सरकारी वकील तथा
लोक अभियोक्ता, चंद्रपूर